




Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!








संपादक : जितेंद्र कायस्थ    Mob- 9822720784    Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे    अंक : ७५०. वा    बुधवार    दि. २४ एप्रिल २०२४    पृष्ठ ८    किंमत ३ रुपये


# शेतकऱ्यांना लुबाडणाऱ्या गाढे बंधूंना तुपकर कुटुंबीयांनीच वाचवण्याचा केला प्रयत्न...


## आमदार संजय गायकवाड यांचा तुपकर दांपत्यावर निशाणा

**जनसंचलन/बुलढाणा**

अपक्ष उमेदवार रविकांत तुपकर हे एकीकडे शेतकऱ्यांचे कैवारी असल्याचे ढोंग करतात, स्वतःला गरीब दाखवून लोकांकडून निवडणुकीसाठी पैसा उकळतात, तर दुसरीकडे शेतकऱ्यांना लुबाडणाऱ्या व्यक्तीला स्वतः च्या घरात ठेवून संरक्षण देतात, असा थेट आरोप बुलडाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी रविकांत तुपकर व त्यांच्या पत्नी शर्वरी तुपकर यांच्यावर साधला आहे. तुपकर हे शेतकऱ्यांप्रति जो काही कैवार दाखवत आहेत, तो पूर्णपणे ढोंगीपणाचा आहे, असा आरोप देखील गायकवाड यांनी या वेळी केला. दर्शकांच्या व वाचकांच्या माहितीसाठी आम्ही येथे सांगू इच्छितो की, काही वर्षांपूर्वी चिखली येथील आडत व्यापारी अंकुश व संतोष गाढे नामक दोन भावांनी शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणावर शेतीमाल खरेदी केला, परंतु शेतकऱ्यांना त्याचे पैसे न देता, त्यांची मोठ्या प्रमाणात फसवणूक केली. या प्रकरणामुळे ज्यांनी मोठ्या कष्टाने व घाम गाळून शेतीमाल पिकवला होता, ते शेतकरी प्रचंड हवालदिल झाले होते. त्यानंतर या विषयावर मोठे वादंग निर्माण झाले. अनेक महिने गाढे बंधू हे चिखलीतून अक्षरशः फरार होते. अशा या गाढे बंधूंना वाचवण्याच्या व त्यांची जमानत करून देण्याच्या विषयाला आता लोकसभा निवडणुकीच्या मतदानाला अवघे दोन दिवस उरलेले असताना चांगलीच फोडणी बसली आहे. हे गाढे प्रकरण पुन्हा बाहेर आल्यामुळे रविकांत तुपकर यांची चांगलीच गोची झाल्याचे पहायला मिळते आहे. या विषयासंदर्भात जेंव्हा आमदार संजय गाकवाड यांना प्रतिक्रिया विचारली असता, त्यांनी स्पष्ट सांगितले की, रविकांत तुपकर यांनी स्वतः शेकडो शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या अंकुश व संतोष गाढे यांना वाचवण्याचा मोठा प्रयत्न केला. रविकांत तुपकर यांच्या पत्नी ॲड. शर्वरी तुपकर यांनी गाढे यांना जामीन मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. तुपकर यांनी या गाढे बंधूंना स्वतःच्या घरात ठेवले. एकीकडे शेतकऱ्यांचा कैवार घ्यायचा, शेतकऱ्यांकडून वर्गणी गोळा करून निवडणूक लढवायची आणि दुसरीकडे शेकडो-हजारो शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या गाढे बंधूंना वाचवण्याचा आटापीटा करायचा, असले ढोंग हे रविकांत तुपकरच करू शकतात. गायकवाड पुढे म्हणाले की, आज रविकांत तुपकर हे सांगत आहेत की जिल्ह्यातील अनेक माता-भगिनींनी त्यांची मंगळसूत्रे देऊन मला निवडणुकीसाठी निधी दिला. परंतु दुसरीकडे ज्या फ्रॉड व्यक्तीने अनेक शेतकऱ्यांच्या बायकांना त्यांचे मंगळसूत्र विकण्यास भाग पाडले, अशा व्यक्तीला वाचवण्याचा प्रयत्न तुपकर दाम्पत्याने केला होता. रविकांत तुपकर काहीही करून आणि खोटे बोलून स्वतःला लोकसभा निवडणुकीच्या लढतीत अग्रेसर दाखवत आहेत. मात्र, रविकांत तुपकरांची वस्तुस्थिती आणि खरे रूप जनतेसमोर उघड झाले असून, जनता त्यांना निवडणुकीत धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही. बुलढाण्यात लोकसभेची लढत ही महायुतीचे उमेदवार प्रतापराव जाधव तसेच महाविकास आघाडीचे उमेदवार प्रा. नरेंद्र खेडेकर यांच्यातच आहे. त्यातही महायुतीचे उमेदवार चांगल्या मताधिक्याने विजयी होतील, असा विश्वास आ.गायकवाड यांनी प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना व्यक्त केला.

### वकिली व्यवसाय व राजकीय जीवन वेगवेगळे : ॲड. अजय दिनोदे

**दरम्यान, बुलढाण्यातील निष्णात वकील ॲड. अजय दिनोदे यांनी दिलेल्या माहितीनुसार गाढे बंधूंचे वकीलपत्र हे रविकांत तुपकर यांच्या पत्नी ॲड. शर्वरी तुपकर यांनी घेतले होते. त्यांनी गाढे बंधूंच्या बाजूने युक्तिवा देखील केला होता. मात्र, त्यांचा युक्तिवाद हा न्यायालयाने ग्राह्य धरला नाही. त्यानंतर ही केस माझ्याकडे आली. मी ही केस लढवली. त्या वेळी गाढे बंधूंनी न्यायालयासमोर अशी ग्वाही दिली की, आम्ही आमची संपत्ती विकून शेतकऱ्यांना सर्व रक्कम परत करतो. त्यानंतर न्यायालयाने गाढे बंधूंना जामीन मंजूर केला. दरम्यान, ॲड. दिनोदे यांनी या वेळी सांगितले की, एखाद्या व्यक्तीचा वकिली व्यवसाय आणि त्याच्या कुटुंबातील इतर व्यक्तीचे राजकीय जीवन हे पूर्णपणे वेगळे आहे. ॲड. शर्वरी तुपकर यांनी गाढे बंधूंची केस घेतली असेल, परंतु तो त्यांचा व्यवसाय म्हणून त्यांनी घेतली असावी. त्याचा राजकीय जीवनाशी काहीही संबंध असेल, असे मला वाटत नसल्याचे सांगितले.**



# साखरपुडा झालेल्या तरुणीचे बनावट फोटो व्हायरल!

**जनसंचलन/ नांदुरा**

साखरपुडा झालेल्या युवतीचे एडिट केलेले फोटो व्हायरल करून समाजात बदनामी केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. शहरातील पीडिते दिलेल्या तक्रारीनुसार बुलढाणा सायबर पोलीस ठाण्यात अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत पीडित तरुणीने तक्रार दिली. २०२१ मध्ये तिचा साखरपुडा झाला होता. मात्र, कोरोना काळातच तिचा भावी पती मृत पावला, यामुळे लग्नासाठी वडिलांनी स्थळे शोधायला सुरुवात केली. इकडे पीडितेने विवाह विषयक जीवनसाथी या संकेतस्थळावर मुलाचा शोध घेतला. त्यात बारामती येथील एकाशी चॅटिंग होऊ लागली. तिने तिचा बायोडेटा पाठवला, भरपूर दिवस उलटून देखील त्याचा बायोडेटा व त्याची वैयक्तिक माहिती पाठविली नाही. पीडितेने फोन



करून विचारले असता, बायोडेटा पाठवतो, असे त्याने सांगितले. तर जानेवारी २०२४ मध्ये शेगावात त्यांच्या समाजाचा उपवर मुला-मुलींचा मेळावा आयोजित होता.

# भरधाव कारची दुचाकीला धडक

**जनसंचलन/ खामगाव**

भरधाव कारने दिलेल्या धडकेत दुचाकीवरील दोघे जखमी झाले. रविवारी ही घटना खामगाव ग्रामीण पोलिस स्टेशन समोर घडली. याप्रकरणी तक्रारीवरून कार चालकाविरोधात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तक्रारीनुसार, स्थानिक मिल्लत कॉलनीतील मोहम्मद वहीद मोहम्मद युसुफ (५५), त्यांच्या मोहम्मद नवेद मोहम्मद वहीद (२१) या मुलासोबत शनिवारी गॅरेज बंद करून घरी जात होते. दरम्यान, ग्रामीण पोलिस स्टेशन समोरून जात असलेल्या एमएच-२८, बीक्यू-८१८७ च्या चालकाने आपल्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणे आणि भरधाव चालवून दुचाकीला धडक दिली. यात फिर्यादी व फिर्यादीच्या मुलास जखमी करून दुचाकीचे नुकसान केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. या तक्रारीवरून शहर पोलिसांनी कार चालकाविरोधात गुन्हा दाखल केला.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# डाक विभागाकडून मतदार जागृती रॅली

जनसंचलन/बुलडाणा

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये मतदानाचा टक्का वाढावा आणि जगातील सर्वात मोठ्या लोकशाही असलेल्या देशातील निवडणुकांमध्ये कुणीही मतदानापासून वंचित राहू नये, यासाठी सर्वस्तरावर प्रयत्न करण्यात येत आहे. यामध्ये बुलडाणा डाक विभागाकडून मतदार जागृतीसाठी आज दि. २३ एप्रिल रोजी मतदाता जागृती रॅली काढण्यात आली होते. जिल्ह्यात निवडणूक आचार संहिता लागू असताना सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करून अतिशय शांत, शिस्तबद्ध पद्धतीने डाक विभागाचे डाक अधीक्षक गणेश आंभोरे यांच्या मार्गदर्शनात सहाय्यक अधीक्षक सतीश निकम आणि पोस्टमास्टर रविंद्र







झिने यांच्या नेतृत्वात रॅली काढण्यात आली. यात डाक कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. यावेळी सर्व मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा व लोकशाहीला मजबूत करावे, असे आवाहन डाक विभागाने केले.

# राज्य उत्पादन शुल्कच्या अवैध दारूविरूद्ध चार कारवाई...



जनसंचलन/बुलढाणा

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाने अवैध दारूविरूद्ध कारवाई सुरू केली आहे. यात आज दि. २३ एप्रिल रोजी चार कारवाया करण्यात आल्या. यात १ लाख ९० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.राज्य उत्पादन शुल्कचे दुय्यम निरीक्षक मलकापूर यांनी दि. २३ एप्रिल रोजी बोदवड-मलकापूर रस्त्याबर बोदवड, जि. जळगाव येथील एका गुन्ह्यांमध्ये एक स्विफ्ट चारचाकी वाहनामध्ये एकुण देशी २५.१२ लिटर आणि विदेशी १७.३२ लिटर असा २ लाख ३५ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. यात दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, मलकापूर श्री. शिंदे आणि जवान ए. पी. सुसरे यांनी सहभाग घेतला.तसेच चिखलीच्या पथकाने नशिराबाद फाट्याजवळ नाईकनगर, ता. सिंदखेडराजा येथे १ पिकअप बोलेरो चारचाकी वाहनासह देशी दारु १९०.०८ लिटर व विदेशी दारू ८.६४ लिटर मद्य पकडुन ७ लाख ३१ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. यात निरीक्षक श्री. रोकडे, दुय्यम निरीक्षक नयना देशमुख, श्री. पहाडे, जवान श्री. तिवाने, संजीव जाधव यांनी सहभाग घेतला. बुलडाणाच्या पथकाने देऊळघाट येथे दोन कारवाया केल्या. यात पहिल्या कारवाईत अशोक सुखदेव पन्हाळे याच्या राहत्या घरी देशी दारु २६४.९६ लिटर मद्य पकडून १ लाख ३ हजार ४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. यात निरीक्षक के. आर. पाटील, सहायक दुय्यम निरीक्षक निलेश देशमुख, जवान अवचार, विशाल पाटील यांनी सहभाग घेतला. दुसऱ्या कारवाईत गजानन दगडू पन्होळे याच्या राहत्या घरातून देशी दारू ४३.२० लिटर मद्य पकडून १६ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. राज्य उत्पादन शुल्क विभागाने आतापर्यंत २०४ गुन्हे नोंदविले असून २०० वारस गुन्ह्यात २०८ आरोपींना अटक केली आहे. यात २२ वाहनांसह ३५ लाख ८३ हजार ६७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या सर्व गुन्ह्यांमध्ये देशी मद्य १ हजार ३४०.४ लिटर. विदेशी मद्य १५०.५२ लिटर. बिअर ९१.०७ लिटर, ताडी १४८ लिटर, रसायन सडवा २६ हजार ९१४ लिटर, हातभट्टी १ हजार ६७६ लिटर पकडण्यात आले आहे.

# शहरात अचानक झालेल्या वादळी वाऱ्यामुळे झाडांची पडझड घरावरील तीन पत्रे उडाली...



जनसंचलन/ शेगाव

२३ एप्रिल रोजी दुपारी दोन वाजता वाजेच्या दरम्यान शेगाव शहरांमध्ये अचानक अवकाळी पाऊस व वाऱ्यामुळे सर्वसामान्यांचे नुकसान झाले आहे अनेक ठिकाणी झाडे गुळापासून उकडून रस्त्यावर पडली असून अनेकांची घरावरील निटपत्रे सुध्दा उडून गेली आहेत. तर सद्या स्थानिक एमएसईबी चौकामध्ये असलेल्या शेगांव खामगांव रस्त्यावर झाड पडल्याने शेगांव खामगांव रस्त्यावरील वाहतुक बराच वेळ खोळंबली होती. अवकाळी पावसामुळे लखपती गल्ली परिसरात राहत असलेले संदेश डांगरा यांच्या घरावरील पाण्याची टाकी हवेमुळे कोलमडली. त्या ठिकाणी कुठलीही जिवीत हानी झालेली नाही. सिध्दीविनायक कॉम्पलेक्स मध्ये असलेल्या जिन्यावरील टिनपत्रे सुध्दा या अवकाळी पावसात उडून गेले. आदर्श नगर परीसरात विजेचे दोन लोखंडी पोल वाकल्याने तिन्ही तार तुटुन अस्ताव्यस्त पडली. बी.जी. परघरमोर यांचे घरासमोरील झाड पडले, राजेश ओईंबे यांच्या अंगनातील आंब्याचे झाड पडले. तर राजरत्न परघरमोर यांचे घरासमोरील अंगणातील निंबाचे मोठे झाड बुडासहीत उन्मळून पडले. तसेच शेगाव विश्रामगृह येथे पोलीस प्रशासनाची सुमो गाडी ही उभी असता त्या गाडीवर अख्खे झाडच पडले. तर अनेक ठिकाणी रस्त्यावर झाडे कोलमडली असल्याने थोड्या वेळात आलेल्या पावसाने सर्व अस्ताव्यस्त झाल्याने काही काळाकरीता जनजिवन विस्कळीत झाले होते

# चिखलीत रेणूका मातेचा जयघोष उत्साहात निघाली वहन मिरवणूक...

जनसंचलन/चिखली

लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या आई रेणुका देवीच्या वासंतिक नवरात्रोत्सवामुळे चिखलीत प्रचंड उत्साह व भक्तीमय वातावरण पहावयास मिळत आहे. दरम्यान, मंगळवारी चैत्र पौर्णिमेला देवी चरणी लीन होण्यासाठी मंदिरात भल्या पहाटेपासूनच भाविकांची अलोट गर्दी उसळली. उत्तरात्रीपर्यंत दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या. तर सायंकाळी ७ वाजता मंदिरापासून वाघ्रारुढ अष्टभुजा रूपातील अष्टधातूच्या भव्य मूर्तीची वहन मिरवणुकीस सुरुवात झाली. चिखलीचे आराध्य दैवत श्री रेणुका देवीचा वासंतिक नवरात्रोत्सव व भव्य यात्रा महोत्सवाचा महत्वाचा दिवस चैत्र पौर्णिमेनिमित्त २३ एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात व भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. मंदिरात प्रातःकाळी नवरात्र उत्थापन, अभिषेक, महापूजा, शेलूद वासीयांचे मानाचे पातळ आणि खण अर्पण, पेठ येथील युवक मंडळाचे गंगाजल व पैनगगा जलाभिषेकानंतर आरती पार पडली. त्या पश्चात गळकरी वगदी प्रदक्षिणा व नवसपूर्ती, जिव्हा त्रिशुलधारी मिरवणूक, एसटी महामंडळाचे मानाचे पातळ अर्पण करण्यात आले. याअनुषंगाने मंदिर परिसरात मोठी गर्दी उसळली होती. दरम्यान सायंकाळी व्याघ्रारूढ अशी अष्टभूजा रूपातील भव्य मूर्तीची वहन नगर परिक्रमेला मिरवणूक निघाली. निघालेल्या रेणुका देवीची वहन मिरवणूक हे या यात्रेचे प्रमुख वैशिष्ट्य वहनोत्सवात आहे. यामध्ये सनई-चौघडा, बॅण्ड पथक, ढोलताशे, नगारे, भजनी दिंड्या, टाळ मृदंगासह वाघ्या-मुरळी, बारूदखाना आदी लक्षवेधी ठरले. मंदिरातून निघालेल्या देवीच्या वहन मार्गावर ठिकठिकाणी भाविकांकडून फटाक्यांची आतषबाजी (बारूदखाना) व रेवड्यांची उधळण स्वागत करण्यात आले. करून जंगी मार्गाच्या दुतर्फा ठिकठिकाणी आबालवृद्धांसह महिला व नागरिकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. रांगोळी काढून देवीच्या वहन मिरवणुकीचे स्वागत करण्यात आले. राज्याच्या कानाकोपऱ्यातून आई रेणुका देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची कुठल्याही प्रकारे गैरसोय होऊ नये, यासाठी प्रशासनासह शहरातील दानशूर भाविक व विविध समाजसेवी संस्थांनी विशेष दक्षता घेतली. यात्रेदरम्यान सर्वत्र पोलिस बंदोबस्त होता तर पालिका प्रशासनाने स्वच्छतेची योग्य खबरदारी घेतली. विश्वस्त मंडळांकडून दर्शनबारी व वहन मिरवणुकीसाठी परिश्रम घेतले.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# लोकसभा निवडणुकीत मतदारांच्या मदतीसाठी व्होटर हेल्पलाईन

## मतदारांना व्होटर स्लीप, संदेश पत्राचे वितरण...

जनसंचलन/बुलढाणा

येत्या लोकसभानिवडणुकीसाठी शुक्रवार दि. २६ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीच्या निमित्ताने भारत निवडणूक आयोगाने मतदारांच्या मदतीसाठी व्होटर हेल्पलाईन ॲप विकसित केले आहे. या ॲपच्या माध्यमातून मतदारांना निवडणुकीसंदर्भात सर्व माहिती आणि सेवा मिळणार आहे. ॲप सहजपणे डाऊनलोड करण्यासाठी क्यूआर कोडही देण्यात आला आहे. व्होटर हेल्पलाईन ॲपला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. भारत निवडणूक आयोगाच्या या ॲपने मतदारांशी संबंधित सेवा देऊन क्रांती घडवून आणली आहे. या ॲपमध्ये नवीन मतदारांची नोंदणी, मतदारांसाठी सेवा, ई-इपिक डाऊनलोड, निवडणूक विषयक माहिती, उमेदवारांची माहिती, निवडणूक निकाल, माहिती स्त्रोत, नवीन घडामोडी, तक्रारी आणि सूचना यासह मतदारयादीतील तपशिलांची दुरुस्ती, मतदारयादीतील नावाचा शोध आणि इतर निवडणूक संबंधित सेवांनी या ॲपने ईसीआयला नागरिकांशी जोडले आहे. तसेच ही प्रक्रिया अधिक सोयीस्कर आणि कार्यक्षम बनविली आहे. मतदारांना मतदान करणे सोयीस्कर व्हावे, यासाठी जिल्हा निवडणूक विभागातर्फे बुलढाणा मतदारसंघातील १७ लाख ८२ हजार मतदारांना व्होटर स्लीपचे घरपोच वाटप करण्यात आले आहे. या स्लीपमध्ये मतदारांचे मतदान केंद्र आणि इतर माहिती देण्यात आली आहे. यासोबतच जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांचे मतदान करण्याबाबतचे आवाहनपर संदेशपत्रक वाटप करण्यात आले आहे. या माध्यमातून मतदारांना मतदान करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येत आहे. मतदान केंद्रावर मतदारांना किमान सोयीसुविधा पुरविण्यात येणार आहे. मतदान केंद्राच्या बाजूच्या खोलीत मतदारांसाठी बैठक, पाणी, पंखे आदीची सोय करण्यात येणार आहे. मतदार याठिकाणी थांबून क्रमाने मतदान करण्यास जाऊ शकतील. दिव्यांग मतदारांना सक्षम ॲपद्वारे सुविधा पुरविण्यात येणार आहे. दिव्यांग मतदारांना ॲपवरून मतदान केंद्रावरील सोयीसुविधांसाठी नोंदणी करावी लागणार आहे. तसेच दिव्यांग आणि ८५ वर्षावरील नागरिकांना घरून मतदान करण्याची सोय दिली आहे. यात आजपर्यंत २ हजार ६५० मतदार म्हणजेच ९३ टक्के मतदान झाले आहे. उष्णाघाताच्या पार्श्वभूमीवर मतदान केंद्राच्या ठिकाणी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच मतदान केंद्रावर वैद्यकीय पथक उपस्थित राहणार आहे. त्यांच्याकडे



औषधे आणि ओआरएसचा पुरेसा साठा उपलब्ध राहणार आहे. मतदानाचा टक्का वाढावा यासाठी गृहनिर्माण सोसायटीं, मेडीकल असोशिएशन यांना आवाहन करण्यात आले आहे. यासोबतच मतदानासाठी कर्तव्यावर असणाऱ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले आहे. यामध्ये ११ हजाराहून अधिक मतदान होणार आहे. या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे १०० टक्के मदान होण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. गेल्या लोकसभेत राज्याचे ६१.०२ टक्के, तर जिल्ह्यात ६३.५४ टक्के मतदान झाले आहे. यावर्षी जिल्हा प्रशासनाने मतदार जनजागृती केली असल्यामुळे मतदानाचा टक्का वाढणार आहे. गेल्या लोकसभेत बुलडाणा विधानसभा क्षेत्रात ५५.३९ टक्के मतदान झाले होते. यावर्षी या भागत मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. नागरिकांनी मतदानासाठी पुढे येऊन मतदान करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# मलकापूर मध्ये भगवान श्री महावीर जन्म कल्याणक उत्सव साजरा



जनसंचलन/मलकापूर

मलकापूर येथे भगवान श्री महावीर जन्म कल्याणक उत्सवा निमित्त विविध सामाजिक कार्यक्रम घेत उत्सव साजरा केला सविस्तर वृत्त असे की दर वर्षी प्रमाणे मलकापूर येथील दिगंबर जैन मंदिर वरील ध्वजारोहण करून भगवान श्री महावीर जन्म कल्याणक उत्सवानिमित्त शहरातून जैन समाज बाधवानी शहरातील विविध मार्ग वरून मार्गक्रमण करीत सकाळी आठ वाजता प्रभात फेरी काढण्यात आली या प्रभात फेरी मध्ये समाजातील जैन समाजातील गुरू महाराज , वृध्द,पुरुष महिला सर्वांनी सहभाग घेत भगवान महावीरांच्या सिद्धांत वर धर्म भजने म्हणत ढोल, ताशे, बँड तालावर जैन बांधवांनी भगवान महावीरांचा जयघोष करत मलकापूर शहराच्या मुख्य रस्त्यावरून मिरवणूक काढली त्यावेळी भगवान महावीरांची मूर्ती असलेला सोनेरी कलरचा रथ आकर्षक व सुंदर सजवण्यात आला होता रथ मध्ये भगवान महावीरांची प्रतिमा शहरवासीयांच्या दर्शनासाठी ठेवण्यात आली त्यावेळी ठिकठिकाणी नागरिकांनी भगवान महावीरांचे दर्शन घेतले तसेच या रॅलीमध्ये माता भगिनी उत्सवात सहभागी होत शहरातील मुख्य चौकामध्ये नागरिकांनी थंड पेय , मठ्ठा, रसना, लिंबू शरबत, व कोल्ड्रिंक मिरवणुकीतील भाविकांना वितरित करण्यात आले ही मिरवणूक नसवाला चौक दिगंबर मंदिर पासून तर आत्मानंद दरबार पर्यंत अती जल्लोषात व उत्साहा पूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली आत्मानंद दरबार या ठिकाणी भगवान महावीरांच्या जन्म कल्याण दिवसानिमित्त सहभागी गुरुदेव यांनी जैन समाजाच्या नागरिकांना भगवान महावीरांचे त्याग समर्पण बद्दल माहिती देत हा भगवान महावीर जन्म कल्याणाक दिवस साजरा करण्यात आला यावेळी आत्मानंद दरबार ठिकाणी समाजातर्फे महाप्रसादाचे आयोजनही करण्यात आले जैन समाजाचे तीन समाज मिळून निर्विघ्न भगवान महावीर स्वामी जन्म कल्याण उत्सवाकरिता दरवर्षी समाजातील एका व्यक्तीला अध्यक्ष स्थान दिल्या जाते त्यामुळे प्रत्येकाला दरवर्षी हा मान मिळतो तर यावर्षी हा बहुमान विजय शांतीलाल गोठी यांना मिळाला त्यावेळी विजय गोठी यांनी महावीर जन्म कल्याण दिवस मोठ्या उत्साहाने साजरा करण्यासाठी समाजाचे व समाज बांधवांचे तसेच सहकारी मित्रांचे आभार व्यक्त केले

# न्याय पालिकेतील कर्मचाऱ्यांची मतदार प्रतिज्ञा...

## कर्मचारी, नागरिकांनी मतदानाचे कर्तव्य पार पाडावे-प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश स्वप्निल खटी

जनसंचलन/बुलडाणा

लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी न्यायपालिकेंतर्गत कार्यरत सर्व कर्मचाऱ्यांनी मतदानाचे कर्तव्य पार पाडावे. तसेच आपले कुटुंबीय आणि आपल्या परिसरातील नागरिकांनाही मतदानाचे कर्तव्य पार पाडण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश स्वप्निल खटी यांनी केले. भारतीय निवडणूक आयोगाने सुरू केलेल्या सुनियोजित मतदार शिक्षण आणि निवडणूक सहभाग या प्रमुख कार्यक्रमांच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शासकीय व निमशासकीय विभागांमधून मतदार जागरूकता मंचाची स्थापन करण्यात आली आहे. समाजातील सर्व घटकामध्ये शासकीय आणि निमशासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून निवडणूक साक्षरता आणि सहकार्यता निर्माण करण्यासाठी हा फोरम महत्वपूर्ण आहे. या पार्श्वभूमीवर सोमवार, दि. २२ एप्रिल रोजी जिल्हा न्यायालय व जिल्ह्यातील सर्व तालुकास्तरावरील न्यायालयांमध्ये प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश स्वप्निल खटी यांच्या मार्गदर्शनाखाली एकाचवेळी मतदार प्रतिज्ञा घेण्यात आली. जिल्हा न्यायाधीश राजेंद्र मेहरे, संजय डिगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा स्वीपचे जिल्हा नोडल बी. एम. मोहन, तसेच दूरचित्रवाणी परिषदेच्या माध्यमातून तालुकास्तरावरील सर्व न्यायालयाचे न्यायधीश, कर्मचारी आणि विधिज्ञ उपस्थित होते. सुरुवातीला सरन्यायाधीश न्या. धनंजय चंद्रचूड यांच्या माझे मत, माझा आवाज या नागरिकांना करण्यात आलेल्या मतदानविषयक आवाहन संदेशाचे प्रक्षेपण करण्यात आले. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा स्वीपचे जिल्हा नोडल बी. एम. मोहन यांनीही मतदान करण्याबाबत सर्वांनी समाजात जागरूकता निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन केले. त्यानंतर जिल्हा न्यायाधीश संजय डिगे यांनी उपस्थितांना मतदार प्रतिज्ञा दिली. जिल्हा प्रणाली प्रशासक प्रदिप शिंदे यांनी सूत्रसंचालन केले.

# मतदानाच्या दिवशी आठवडी बाजार रद्द...

जनसंचलन/मोताळा




लोकसभा निवडणुकीसाठी शुक्रवार, दि. २६ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर मलकापूर आणि नांदुरा तालुका वगळता असणारे आठवडी बाजार रद्द करण्यात आले आहे. निवडणूक कालावधीतील आदर्श आचार संहितेचे पालन करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले आहे. त्यानुसार आठवडी बाजारात मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असल्याने रहदारीस अडथळा निर्माण होऊ शकतो. याचा मतदानाच्या टक्केवारीवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे बाजार व जत्रा अधिनियम १८६२च्या कलम ५ नुसार बुलढाणा लोकसभा मतदारसंघासाठी मतदान होणार असल्यामुळे कायदा व सुव्यवस्था तसेच वाहतुकीस अडचण निर्माण होणार नाही यादृष्टीकोनातून मलकापूर आणि नांदुरा तालुका वगळता शुक्रवारी भरणारे बाजार रद्द करण्यात आले आहे, असे आदेश जिल्हादंडाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिले आहे..

# महायुतीचे उमेदवार प्रतापराव जाधव यांच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांची तोफ गरजली खामगावमध्ये...

## या विराट सभेला हजारोंच्या संख्येने उसळला जनसागर...

## असली व नकली शिवसेना कोणाची हे जनतेला कळते- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

जनसंचलन/खामगाव

महायुतीचे उमेदवार प्रतापराव जाधव यांच्या प्रचारार्थ राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांची तोफ खामगाव मध्ये गरजली. या सभेला हजारोच्या संख्येने नागरिक उपस्थित होते.देशात रामजन्मभूमी ठिकाणी भव्य राम मंदिर निर्माण व्हावे. तसेच काश्मिरमधील कलम ३७० हटविले जावे, हे हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे स्वप्न होते, ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पूर्ण केले. असे प्रतिपादन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. बुलढाणा लोकसभा मतदार संघाचे महायुतीचे उमेद्वार खा. प्रतापराव जाधव यांचे प्रचारार्थ येथील जे. व्ही. मेहता विद्यालयाच्या पटागंणावर आयोजित विशाल सभेत मंगळवारी संध्याकाळी ते बोलत होते. असली व नकली वाघ कोण आहेत? हे जनतेला कळते. उध्दव ठाकरे हे बाळासाहेबांच्या संपत्तीचे वारस आहेत. तर आम्ही बाळासाहेबांच्या विचारांचे वारस आहोत. कॉंग्रेस सोबत सरकार बनविणे हा जन-तेचा विश्वसघात होता. ती चूक आम्ही दुरुस्त केली, आज देश महासत्तेकडे मोदी घेऊन जात आहे. असेही मुख्यमंत्री म्हणाले. सोयाबीन, कापूस भाव फरकसाठी कोटी रुपये ८४ हजार शिंदे सरकारने मंजूर केलेले असून आचार संहिता संपल्यावर भावांतर योजने अंतर्गत ही फरकाची रक्कम थेट शेतकऱ्यांचे खात्यात देणार आहोत, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. बुलढाणा जिल्ह्यात १० हजार ३०० कोटीचे प्रकल्पाचे काम सुरु





असून खामगाव- जालना रेल्वेसाठी अर्धी रक्कम देणे, जिगाव प्रकल्पासाठी ७ हजार ४०० कोटी दिले, बोदवड सिंचन योजनेसाठी ५५० कोटी, तर वैनगंगा-नळगंगा- पैनगंगा हा ५५० कि. मी. चा नदीजोड प्रकल्प करणारच अशी ग्वाही ना. देवेंद्र फडणवीस यांनी दिली. तर अफवा व खोटे बोलण्यास बळी पडू नका, असे आवाहन करून खा. प्रतापराव जाधवांना निवडून द्यावे, असे म्हटले. यावेळी मंचावर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व उमेद्वार समवेत विधानपरिषद उपसभापती निलमताई गोरे, माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे, आमदार डॉ. संजय कुटे, आमदार ॲड. आकाशदादा फुंडकर, आमदार डॉ. संजय रायमुलकर, आमदार सौ. श्वेताताई महाले, आमदार किरण सरनाईक, माजी आमदार चैनसुख संचेती, शशिकांत खेडेकर, राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष ॲड. नाझीर काजी, मनसेचे विठ्ठलराव लोखंडकार, सचिन देशमुख, नरहरी गवई, राजुभाऊ सावळे, शांताराम दाणे, विनोद वाघ, योगेंद्र गोडे, देवेंद्रदादा देशमुख, ऋषीकेश जाधव, आशाताई झोरे, सौ. शिल्पा बोडखे, सौ. जायभाये, ज्योतीताई वाघमारे सोलापूर आदी उपस्थित होते. सदर जाहीर सभेचे प्रास्ताविक आमदार ॲड. आकाशदादा फुंडकर यांनी केले. तत्पूर्वी ॲड. अमोल अंधारे, ज्योतीताई वाघमारे, निलमताई गोरे यांचे मनोगत झाले. तर प्रास्ताविकानंतर आमदार डॉ. संजय कुटे, माजी मंत्री डॉ. शिंगणे, खा. प्रतापराव जाधव यांची समयोचित भाषण झाले. जाहीर सभेचे उत्कृष्ट संचलन ॲड रमेश भट्टड यांनी तर आभार प्रदर्शन ॲड. अमोल अंधारे यांनी केले.

---

## संदीप शेळकेंनी तिसऱ्यांदा घेतला बूथ प्रमुखांचां मेळावा !

## निवडणुकीचे केले सूक्ष्म नियोजन बूथ कमिटी सशक्त आणि पक्के नियोजन असल्याने विजयाचा विश्वास संदीप शेळके

जनसंचलन/बुलढाणा

कोणतेही काम यशस्वी करायचे असेल तर ते नियोजनाशिवाय होत नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्या-ज्या मोहिमा फत्ते केल्या त्या परफेक्ट नियोजनाच्या आधारावरच केल्या. एका बाजूला बलाढ्य शत्रू आणि दुसऱ्या बाजूला अपुरी शस्त्रे, शेतीमातीत राबणारे मात्र स्वराज्याचा संकल्प केलेले मावळे होते. प्रत्यक्ष दिसतांना ही लढाई एकतर्फी दिसायची मात्र स्वराज्याप्रती निष्ठा आणि परिपूर्ण नियोजनाच्या आधारावर छत्रपती शिवाजी महार-ाज मोहीम फत्ते करायचे. आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांचे मावळे असून त्यांच्या विचारांवर, तत्त्-वावर चालणारे आहोत. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून जनकल्याण हाच एकमेव हेतू डोळ्यासमोर ठेवून निवडणूक लढवत आहोत. नियोजनाचा भाग म्हणून बूथ बांधणीचे पक्के नियोजन झाले आहे. आपली बूथ कमिटी जेवढी सशक्त आहे तेवढी राजकीय पक्षांची देखील नाही, त्यांना बुथवर माणसंही मिळत नाहीत. आपलं जसं ठरलं त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करा, आपला विजय कुणीही रोखू शकत नाही असे प्रतिपादन वन बुलडाणा मिशनचे संकल्पक, बुलडाणा लोकसभेचे अपक्ष उमेदवार संदीप शेळके यांनी केले. काल, बुलडाणा छत्रपती संभाजीनगर रस्त्यावरील कोलवड येथील प्रियंका लॉन मध्ये बूथ प्रमुख आणि बूथ कमिटी सदस्यांचा मेळावा पार पडला यावेळी ते बोलत होते. कुठलाही राजकीय पक्ष नसतांना, राजकीय पार्श्वभूमी नसतांना संदीप शेळके यांनी प्रचारात घेतलेली आघाडी विरोधकांनाही तोंडात बोट घालायला ला-वणारी आहे. गेल्या ४० दिवसांत संदीप शेळके यांनी तिसऱ्यांदा बूथ प्रमुख आणि बूथ कमिटी सदस्यांचा मेळावा घेतला आहे. याशिवाय तालुका पातळीवर देखील बूथ कमिटी सदस्यांच्या कार्यशाळा झाल्या आहेत. काल झालेल्या मेळाव्याला ६५३९ बूथ प्रमुख व बूथ कमिटी सदस्यांची उपस्थिती होती. या मेळाव्यात प्रारंभी विधानसभा आणि जिल्हा परिषद सर्कल निहाय गटश: चर्चासत्र संपन्न झाले. त्यानंतरच्या एकत्रीत सत्रात विधानसभा प्रमुखांनी



आपापल्या क्षेत्रातील नियोजनाची माहिती दिली. समारोपीय सत्रात संदीप शेळके यांनी मार्गदर्शन केले. यावेळी बोलतांना संदीप शेळके म्हणाले की, आपल नियोजन ज्या प्रमाणे ठरलं आहे त्या प्रमाणे त्याची अंमलबजावणी करा, आपला विजय कुणीही रोखू शकणार नाही. जिल्ह्याच्या शाश्वत विकासाच्या लढाईतील वन बुलडाणा मिशनच्या बूथ प्रमुख आणि बूथ कमिटी सदस्यांचे यो-गदान विसरता येणार नाही, या लढ्यात भागीदारी करण्याची सुवर्णसंधी आपल्याला निवडणुकीच्या निमित्ताने प्राप्त झाल्याचे संदीप शेळके म्हणाले.

## चिमुकलीसह विवाहिता बेपत्ता

जनसंचलन/मोताळा

एक २३ वर्षीय विवाहिता तिच्या दोन वर्षांच्या चिमुकलीसह बेपत्ता झाल्याची घटना १९ एप्रिल रोजी सकाळी नऊ वाजेच्या सुमारास बोराखेडी येथे उघडकीस आली आहे. याप्रकरणी २२ एप्रिल रोजी दिलेल्या फिर्यादीवरून बोराखेडी पोलिसांत हरविल्याची नोंद करण्यात आली आहे. तालुक्यातील बोराखेडी येथील स्वप्निल शंकर एखनार या युवकाने बोराखेडी पोलिसांत दिलेल्या फिर्यादीनुसार गावातील त्याची बहीण मनीषा सुरेश भिसे ही २३ वर्षीय विवाहिता तिच्या दोन वर्षांच्या चिमुकलीसह १९ एप्रिल रोजी सकाळी नऊ वाजेच्या सुमारास घरात कोणाला काहीही न सांगता कुठे तरी निघून गेली आहे. तिचा आसपास तथा नातेवाइकांकडे शोध घेतला असता कुठेही मिळून आली नाही, अशा स्व-प्निल एखनार याने २२ एप्रिल रोजी बोराखेडी पोलिसांत दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी हरविल्याची नोंद केली आहे. तपास नायक पोलिस कॉन्स्टेबल अमोल खराडे हे करीत आहेत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक – जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958